महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम
जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय ....... ठाणे

| | | |
|---|---|---|
| दुरध्वना क्रमांक - कार्यालय<br>फॅक्स नंबर - 025831925<br>ईमेल - dmu@rediffmail.com | | जिल्हा हिवताप अधिकारी, ठाणे<br>कार्यालय |
| आरोग्य सेवा<br>कार्यालयीन आदेश | | जा.क्र.जिहिअ/आस्था/आक्र.४० टक्के/ 3513-22 /२०२१<br>दिनांक - 12 / 08 / २०२१ |

विषय :- बहुउद्येशिय आरोग्य कर्मचारी, (पुरुष) गट-क या पदावर ४० टक्के कोटयातुन सरळसेवेने नियुक्ती बाबत.....
उमेदवाराचे नाव :- श्री मनोज शेखराव बोडगे

संदर्भ :- १. मा.सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र क्र.पदभरती-२०२०/प्र.क्र८८/ दि.०९.१२.२०२०.
२. मेसर्स जिंजरवेब प्रा.लि,नोयडा,उत्तरप्रदेश यांची निवड यादी दि.१६.०४.२०२१.
३. दिनांक [illegible].२०२१ रोजीचे समुपदेशन

जिल्हा हिवताप अधिकारी ..ठाणे.... यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील स्तंभ क्र. २ मधील उमेदवारास स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी **बहुउद्येशिय आरोग्य कर्मचारी, (पुरुष) (गट-क)** (वेतन स्तर-.S-8 : 25500-81100) या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीचे आदेश निर्गमित करीत आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | प्राप्त गुण व गुणवत्ता क्रमांक | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री मनोज शेखराव बोडगे | 174/99<br>37526103 45-S.N | प्रा.आ.केंद्र खारबाव<br>उपकेंद्र, पायगाव, ता. भिवंडी |

श्री / श्रीमती मनोज.शेखराव.बोडगे यांना कळविण्यांत येते की, **जिल्हा हिवताप अधिकारी**..ठाणे..... या कार्यालयाचे आस्थापनेवरील **बहुउद्येशिय आरोग्य कर्मचारी, (पुरुष)(गट-क)** पदावर सर्वसाधारण (अजा) प्रवर्गातून या कार्यालयांत रिक्त असलेल्या पदी **(वेतन स्तर - S-8 : 25500-81100)** या वेतनश्रेणीत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहुन नेणमुकीचे आदेश निर्गमित करण्यांत येत आहेत.

१) सदर नेमणुकीचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत आपण आपणांस दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी त्वरीत हजर व्हावे. व रुजू अहवाल सादर करावा. आपण या कालावधीत हजर न झाल्यास या पदावर रुजू होण्यास इच्छुक नाही, असे समजून आपली नेमणुक रद्द करण्यांत येईल.

२) आपली नेमणुक जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेल्या शारिरीकदृष्टया पात्र असल्याच्या प्रमाणपत्रावर आधारीत आहे. सदर उमेदवाराची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणतेही कारण न दाखवता सेवेतून मुक्त करण्यात येईल. शासनास किंवा नियुक्ती प्राधिका-यास एक महिन्याची पूर्वसूचना दिल्याशिवाय उमेदवारास नोकरी सोडता येणार नाही. जर ते पूर्वसूचना देऊ

शकले नाहीत तर उमेदवारास एक महिन्याचे मूळवेतन शासन तिजोरीत भरावे लागेल. किंवा एक महिन्याच्या मूळ वेतना एवढी रक्कम महसूलाची शिल्लक म्हणून उमेदवाराकडून योग्य त्या प्राधिका-यामार्फत वसूल केली जाईल. यामध्ये कसूर केल्यास सदरची रक्कम महसूली येणे म्हणून वसूल करण्यांत येईल.

३) उमेदवारास नोकरीत असताना पूर्व परवानगी शिवाय दुसरीकडे नोकरी स्विकारता येणार नाही.

४) उमेदवाराची बदली जिल्हा हिवताप कार्यालयांतर्गत महाराष्ट्र राज्यात कोठेही होऊ शकेल.

५) उमेदवारास एक पत्नी / पती हयात असताना दुसरा विवाह करता येणार नाही.

६) उमेदवारास राष्ट्रीयत्वाची व गोपनीयतेची शपथ घ्यावी लागेल.व तसेच, शपथपत्र विहीत प्रपत्रात लेखी द्यावे लागेल.

७) उमेदवाराच्या सेवेची संरक्षण खात्यास आवश्यकता वाटल्यास उमेदवाराची सेवा संरक्षण खात्याकडे वर्ग करण्यात येतील.

८) उमेदवाराची नियुक्ती चारित्र्य व पूर्व चारित्र्य समाधानकारक असल्याबाबतचे पोलीस खात्याकडून प्रमाणपत्र प्राप्त होण्याच्या अटीवर करण्यांत आलेली असून त्यामध्ये काही आक्षेपार्ह अहवाल प्राप्त झाल्यास त्यांच्या सेवा संपुष्टात येतील.

९) पदावर रुजू झाल्यानंतर संबंधीत उमेदवाराने साक्षांकन नमुन्याची एक प्रत संबंधीत आस्थापना अधिकारी यांचेकडे जमा करावी व संबंधीत आस्थापना अधिकारी यांनी सदर उमेदवाराच्या पोलीस पडताळणीची कार्यवाही आपल्या कार्यालयाच्या स्तरावर पार पाडावी व तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास पाठवावा. पोलिस पडताळणी अहवालाद्वारे उमेदवारावर कुठल्याही प्रकारचा गुन्हा दाखल असल्याचे आढळुन आल्यास, सदर उमेदवारांची नियुक्ती संपुष्टात आणण्याचे अधिकार जिल्हा हिवताप अधिकारी...ठाणे...... यांनी राखून ठेवले आहेत आणि त्या प्रसंगी सदर उमेदवार रुजू झाल्याच्या दिनांकापासून नेमणूक संपुष्टात आणण्याच्या दिनांकापर्यंत सदर उमेदवारास दिली गेलेली वेतनाची रक्कम विभागास परत घेण्याचा अथवा वेतनाची देय असलेली रक्कम राखून ठेवण्याचा **जिल्हा हिवताप अधिकारी**...ठाणे....... यांचा हक्क असेल.

१०) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.बीबीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०१२/१६-ब,दि.१२.१२.२०११ अन्वये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे. अशा उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास अशा उमेदवारांनी नियुक्तीच्या आदेशाच्या दिनाकांपासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता सादर करावी. सदर कालावधीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराची सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

११) ज्या उमेदवारांची नियुक्ती राखीव प्रवर्गातून झाली आहे तसेच ज्या मूळच्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची शिफारस खुल्या प्रवर्गातून झालेली आहे. परंतू अशा उमेदवारांनी परिक्षेस अर्ज राखीव प्रवर्गातुन दाखल केलेला आहे, अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र,नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

१२) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रात नोंदविण्यात आलेली जन्मतारीख ही बरोबर असून त्याबावत त्यांनी कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र कार्यालयास त्वरीत सादर करावे लागेल. मूळ सेवापुस्तकात करण्यात आलेली जन्मतारखेची नोंद उमेदवाराने नेमणूक स्विकारल्यापासून पाच वर्षानंतर बदलण्यात येणार नाही.

१३) नेमणूकी संबंधात सादर केलेली माहिती / प्रमाणपत्रे खोटी असल्याचे आढळून आल्यास तसेच सेवा शर्ती नियमानुसार आवश्यक असणारी शासन मान्य संस्थेची प्रमाणपत्रे आढळून न आल्यास उमेदवारा विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. व उमेदवाराची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१४) शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/१२, दि.१.७.२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (**लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र**) नियम-२००५ मधील **''प्रतिज्ञापत्र''** नेमणूक स्विकारताना भरुन देणे बंधनकारक राहील. सदर प्रतिज्ञापत्रातील माहिती खोटी आढळून आल्यास उमेदवाराची नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल.

१५) सदर नियुक्ती ही प्रथम नियुक्ती असल्याने नेमणूकीचे ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१६) बहुउद्येशिय आरोग्य कर्मचारी (गट-क) ४० टक्के कोटयातील पदावरील नियुक्ती स्विकारण्यापूर्वी एखादा उमेदवार अन्य कोणत्याही शासकीय / निमशासकीय / इतर कार्यालयात नोकरीत असेल तर त्यांना त्या नोकरीचा राजीनामा किंवा कार्यमुक्ती आदेश नियुक्ती स्विकारते वेळी सादर करावा लागेल. अन्यथा सदर उमेदवारास बहुउद्येशिय आरोग्य कर्मचारी (गट-क) पदावर हजर करुन घेण्यात येणार नाही.

१७) **सदरहू आदेशान्वये उमेदवाराने नियुक्ती स्विकारल्यास त्यांना वरील अटी व शर्ती मान्य आहेत असे गृहित धरण्यात येईल.**

१८) दि.०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच उमेदवारांस नविन **''परिभाषित अंशदान निवृत्तीयोजना''** लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम-१९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशिकरण) नियम-१९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. (शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४,मंत्रालय,मुंबई दिनांक ३१.१०.२००५.)

१९) उमेदवाराने नेमणूक स्विकारल्याबाबतचा रुजू अहवाल संबंधित कार्यालयास सादर करावा.

२०) उमेदवारांनी शासन सेवेसाठी वैद्यकियदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र वैद्यकीय मंडळाकडुन प्राप्त करुन घेऊन ते कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहिल.

२१) संबंधित कार्यालय प्रमुखाने उमेदवार हजर होते वेळी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या व इतर प्रमाणपत्राच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करावी.

२२) बहुउद्येशिय आरोग्य कर्मचारी (गट-क) ४० टक्के पदासाठी विहित प्रशिक्षण मुदतीत व संधीत पुर्ण करुन उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२३) ज्या उमेदवारांची निवड दिव्यांग कोटयातुन झालेली आहे अशा उमेदवारांनी ते **बहुउद्येशिय आरोग्य कर्मचारी (पुरुष) गट-क** या पदावर काम करण्यात सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र वैदयकिय मंडळाकडून प्राप्त करुन घेऊन ते कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहिल.

२४) उमेदवाराच्या अनुभव प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबत पडताळणीनंतर सदर प्रमाणपत्र खोटे / अवैध आढळून आल्यास उमेदवार नेमणूकीस अपात्र ठरेल तसेच खोटे / अवैध प्रमाणपत्र सादर केल्याबद्दल कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

२५) उमेदवाराचे चारित्र्य व सचोटी याबाबतची चौकशी व पडताळणी ते रहात असलेल्या ठिकाणातील पोलीस विभागाकडून झाल्यानंतर त्यात उमेदवार दोषी आढळल्यास उमेदवाराच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील.

२६) उमेदवाराची सेवा केवळ **हिवताप** कार्यक्रमापुरतीच मर्यादित नसून उमेदवारास सार्वजनिक आरोग्यसेवेतील इतर योजनेतही काम करणे बंधनकारक राहील.

२७) उमेदवारास सेवेत असताना वेळोवेळी घेण्यात येणा-या प्रशिक्षणास उपस्थित रहावे लागेल

२८) शासनाकडील प्रचलित शासन निर्णयानुसार उमेदवाराने महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण, मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी.हि संगणक प्रमाणपत्र प्रत्यक्ष कामावर हजर झाल्यापासून सहा महिन्यांचे आत उत्तिर्ण होणे बंधनकारक आहे.

२९) उमेदवाराने शासनाने ठरवुन दिलेल्या विहीत हिंदी व मराठी भाषेच्या परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

३०) खाजगी व्यवसाय करण्यास प्रतिबंध राहिल.

३१) राहण्याचे मुळ ठिकाण (स्वग्राम) घोषित करणे अनिवार्य राहिल.

(.....................)
जिल्हा हिवताप अधिकारी

प्रति,

श्री. मनोज शेषराव थोरात
मु.पो. कोथळाज, ता. हिंगोली.
जि. हिंगोली...........

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई.
३) मा.संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मा.सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे-६.
५) मा.उपसंचालक आरोग्य सेवा, आरोग्य सेवा मुंबई. मंडळ ..ठाणे..
६) मा.सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) .को.भ. नवी मुंबई
७) मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद .....ठाणे.
८) मा.जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, ..ठाणे

......................